विधान सभा
महाराष्ट्र

**आ. सुधीर मुनगंटीवार**

अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक :

प्रति,

दिनांक : ३०.८.२०१०

मा. ना. डॉ. पतंगराव कदम

वनमंत्री

महाराष्ट्र शासन,

मंत्रालय, मुंबई-32

सप्रेम नमस्कार !

विषय: वर्धा येथील अशासकीय संस्थेतर्फे पेंच व्याघ्र प्रकल्प, बोर अभयारण्य, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात करण्यात आलेल्या 4-5 कोटी रूपयांच्या कामाबाबत.

महोदय,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) ह्यांचे अंतर्गत येत असलेल्या मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर, वनवृत्त यांचे तर्फे पेंच व्याघ्र प्रकल्प, बोर (वन्यजीव) अभ्यारण्य, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प इ. विविध कार्यालयातर्फे 2007-08 व 2008-09 ह्या आर्थिक वर्षात, महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाच्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता 4-5 कोटी रूपयां कामे वर्धा येथील एका अशासकीय संस्थेतर्फे करवून घेतली. वास्तवित ही बांधकामे निसर्ग पर्यटन ह्या योजनेअंतर्गत मंजूर करून घेतली होती व ती वनविभागातर्फे निविदा काढून किंवा सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे करविणे आवश्यक होते, परंतु तसे न करता, केवळ 100 रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर एमओयु करून करण्यात आली. ही कामे करतांना संपूर्ण रक्कम धनादेशाद्वारे अग्रीम म्हणून देण्यात यावी. तसेच सुरक्षा ठेव घेतलेली नाही. तांत्रिक मंजूरी, प्रशासकीय मंजूरी, मोजमाप पुस्तीका ह्या सारख्या प्राथमिक गोष्टी सुद्धा केल्या नाहीत. एवढेच नव्हेतर विक्रीकर (वॅट), आयकर ह्यांची सुद्धा वसुली शासकिय नियमानुसार संस्थेकडून करून चलनने कोषागारात भरणे जरूरी

Computer D:\1\2-8-2010p.65

कार्यालय : सीटी.ओ. बॅंक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com

विधान सभा महाराष्ट्र

आ. सुधीर मुनगंटीवार

अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जावक क्रमांक :

होते. परंतु 4.5 लक्ष रूपयांची ही रक्कम संबंधित संस्थेला (ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र वर्धा ) देण्यात आली आहे. सदरची कामे सुद्धा निकृष्ट दर्जाची आहे. एकूणच हे प्रकरण अतिशय गंभीर व आर्थिक अनियमितता सिद्ध करणारे आहे.

यासंदर्भात वन्यजीव नागपूर वृत्ताचे मुख्य वनसंरक्षक श्री. नंदकिशोर यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. यासंदर्भात मी स्वतः प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांना तपशिल मागविण्यासाठी पत्रव्यवहार केला. परंतु सदर तपशिल मला अद्याप अप्राप्त आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे.

आपण या गंभीर प्रकाराची त्वरीत दखल घेवून सदर प्रकरणी दोषींवर कडक कारवाई करावी व मी पत्रव्यवहाराद्वारे मागविलेला तपशिल त्वरीत मिळवून द्यावा, अशी आपणास विनंती आहे.

कार्यवाहीची सविस्तर रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा.

सविनय धन्यवाद !

आपला स्नेहांकित

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत माहितीस सादर :

मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक

म.रा. , नागपूर

Computer Jb Hv(1-8 2010p.85)

कार्यालय : सीडी.ओ. बरॅक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२०
दूरध्वनी : २२०२२०५०/२२०४८६८७ फॅक्स : २२८५२३०५ सचिव : मोबाईल : ९८२२५६५९२६
चंद्रपूर : भाग्यश्री, गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२४०१. दूरध्वनी : ऑफिस (०७१७२) २५२५८२, २५६०६९, फॅक्स : २५८८००.
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in / ajaydhawane@gmail.com